पत्र जा.क्र.कृआ/विप्र-१/राकृवियो-तूर/मा.सू/१४०२/२०१४/

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,

पुणे-४११ ००५, दिनांक : २४/०६/२०१४

प्रति,

१) विभागीय कृषि सह संचालक (सर्व)

२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

विषय :- सन २०१४-२०१५ राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या “संकरित” वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोस्ताहन देणेबाबत.

संदर्भ :-१) **या कार्यालयाचे आंग्लभाषीय पत्र क्रमांक**comm../extn-1/RKVY Tur/1/140/2014. Date 6/6/2014.

२) जा.क्र कृआ/विप्र-१/राकृवियो/सं-तूर/१४०२/२०१४/१५७ दिनांक २१ जून, २०१४

केंद्र शासनाने सन २०१४-१५ पासुन पिक विकासाच्या योजनांची अंमलबजावणी विविध मिशन स्वरुपात राबविण्याचे धोरण निश्चीत केले आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या “संकरित” वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोस्ताहन देण्याबाबत हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदरचा कार्यक्रम खालील २० जिल्हयात राबवावयाचा आहे. नंदुरबार, जळगाव,अहमदनगर,सोलापूर,औरंगाबाद, जालना,बीड, लातूर, उस्मानबाद, नादेंड,परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम,अमरावती, यवतमाळ,वर्धा, नागपूर,चंद्रपुर, सदरचा कार्यक्रम प्रकल्प स्वरुपात राबवावयाचा आहे. यासाठी १०० हेक्टर प्रमाणे ६० प्रकल्पांची निवड करुन कार्यक्रमाची अंबलबजावणी करावयाची आहे.

या योजनेकरीता १०० टक्के निधी रा.कृ.वि.योजनेतून उपलब्ध होणार असून सदरचा निधी जिल्हयास आरटीजीएस व्दारे ( RTGS ) उपलब्ध्द करुन देण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी सविस्तर मार्गदर्शक सुचना सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

**कृषि संचालक**
**( विस्तार व प्रशिक्षण )**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११ ००५**

प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.

१) मा.अपर मुख्य सचिव, कृषि व पणन, मंत्रालय विस्तार, मुंबई ३२

२) मा. मंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक.

३) मा. राज्यमंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक.

प्रतः-   माहितीस्तव सस्नेह अग्रेषित

४)   कृषि संचालक (सर्व)

५)   मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळ, राजन  हाऊस, तिसरा मजला, प्रभादेवी, मुंबई २५.

६)   मा. व्यवस्थापकीय संचालक ,मार्केटींग फेडरेशन मुंबई

७)   व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, प्लॉट-८, शास्त्रीनगर, अकोला

८)   मा. व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय बीज निगम, गुलटेकडी, मार्केटयार्ड,पुणे ३७.

९)   संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

१०)   संशोधन संचालक,डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.

११)   संशोधन संचालक, महात्मा फुले  कृषि विद्यापीठ, राहूरी.

१२)   संशोधन संचालक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

प्रति सहपत्रासह माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

१)   कृषि उपसंचालक, आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

२)   कृषि माहिती अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५आवश्यकत्या प्रसिध्दीसाठी.

३)   कृषि उपसंचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे-५

कृषि संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, म.रा.पुणे - ४११००५.

सन २०१४-२०१५ राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या “संकरित” वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोस्ताहन देणेबाबत.

# मार्गदर्शक सूचना

प्रस्तावना-

महाराष्ट्रात तूर हे दुसऱ्या क्रमांकाचे महत्वाचे कडधान्य आहे. त्याची लागवड एकूण ११.३७ लाख हेक्टर असुन सरासरी वार्षिक उत्पादन ८.७८ लाख मे. टन आहे. तसेच सरासरी राज्याची उत्पादकता ७७२ किलो ग्रॅम प्रति हेक्टर इतके आहे.

इक्रिसॅट रिसर्च इंस्टिटयुट फॉर सेमी- अरीड ट्रॉपीकस (ICRISAT) पतनचेरु, आंध्रपदेश यांनी विकसीत केलेले संकरीत तुरीचा वाण ICPH २७४० ( सत्यप्रत ) याचे महराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भात सन २००५-२०१२ मध्ये प्रयोग घेण्यात आलेले आहेत. सदर संकरीत तुरीचा वाण ICPH २७४० हा फ्युजॅरीयम विल्ट व स्टॅरलिटी मोझॅक या रोगास प्रतिकारक असुन खोल काळया मृदेस सोयीस्कर आहे. तसेच सदर वाण १८० दिवसात काढणीस येतो. स्थानिक वाणाच्या तुलनेत उत्पादनात ३०-४० टक्के वाढ आहे. मराठवाडा व विदर्भाच्या बहुतांश जिल्हयात संकरीत वाण अधिक कार्यक्षम आहे.

वरील सर्व बाबींचा तुर या पिकाचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी विचार करता राज्य शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत तुर उत्पादक जिल्हयामध्ये कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. राज्यातील प्रमुख २० तुर उत्पादक जिल्हयामध्ये कार्यक्रमाची अंमलबजावणी करावयाची आहे.

❖ संकरीत तुर वाण ICPH २७४० प्रोस्ताहनपर कार्यक्रम

१) मराठवाडा व विदर्भात खरीप कडधान्यात तुर हे महत्वाचे पिक आहे.
२) तुर पिकाचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास वाव आहे.
३) कडधान्य पिकात संकरीत तंत्रज्ञानास प्रोत्साहन करणे गरजेच आहे.
४) ३५ ते ४० टक्के जास्त उत्पादन क्षमता .

❖ कार्यक्रमाचा उद्देश

१) तुर पिकाचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविणे.
२) तुरीच्या संकरीत वाणास प्रोस्ताहन देणे.
३) क्षेत्रिय स्तरावरील अर्थकारण सुधारणे ( शेतीतील नफा वाढविणे )
४) वाढत्या लोकसंख्येची गरज भागवण्यासाठी कडधान्य पिकाचे उत्पादन वाढविणे.

❖ कार्यक्रमातील घटक-

१) बियाणास अर्थसहाय्य(सत्यप्रत)
२) ऐकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापना
३) ऐकात्मिक किडव्यवस्थापना
४) जैविकखतांचा वापर
५)क्षमता वृध्दी कार्यक्रम

❖ सविस्तर कार्यक्रम खालील प्रमाणे.

१) सहभागी जिल्हे :-२० जिल्हे
२) क्षेत्र व्याप्ती :- ६००० हेक्टर
३) लाभार्थी संख्या :-१५०००
४)प्रस्तावित कार्यक्रम खर्च :- रु.१०६.०० लाख
५)लाभार्थी हिस्सा / लोकवाटा :- रु.३७.५० लाख
६) एकूण प्रस्तावित कार्यक्रम :- रु.१४३.५० लाख
७)संकिर्ण ( कार्यक्रमाच्या १टक्का ) :- रु.१.४२ लाख
८)एकूण कार्यक्रम :- रु.१४४.९२

❖ कार्यक्रमातील सहभागीदार

सदर कार्यक्रमासाठी कृषि विभाग, महाराष्ट्र शासन नोडल संस्था आहे. बियाणे साठी महाराष्ट्र बियाणे महामंडळ व इक्रिसॅट क्रॉप रिसर्च इंस्टिटयुट फॉर सेमी- अरीड ट्रॉपीकस (ICRISAT) हे सहभागीदर आहेत. तसेच निविष्ठ पुरवठयासाठी MAIDC हे सहभागीदार आहेत. संपुर्ण कार्यक्रमाचे निरीक्षण हे कृषि विभाग, महाराष्ट्र शासना मार्फत करण्यात येईल.

❖ एकूण प्रकल्प आवश्यक निधी

१ वर्षासाठी एकूण प्रकल्पाचा खर्च रु.१४४.९२ लाख अपेक्षित आहे.यामध्ये १०७.४२ लाख राष्ट्रीय कृषि योजनेमधून उपलब्ध होणारा तर लाभार्थी हिस्सा पोटी रु. ३७.५० लाख निधीचा समावेश आहे.

❖ फलनिष्पत्ती

१) राज्यातील तुर या पिकाचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे.
२) जनजागृती करणे.
३) संकरीत तुर वाणाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती करणे.

राज्यात सन २०१४-१५ या वर्षापासून केंद्र शासनाने पिक विकासाच्या योजनांची अंमलबजावणी विविध मिशन स्वरुपात राबविण्याचे धोरण निश्चीत केले आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या “संकरित”वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास तुर उत्पादन कार्यक्रम २० जिल्हयामध्ये राबवयाचा आहे. सदरचा कार्यक्रम प्रोस्ताहनपर तत्वावर राबविण्यात यावा.कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी करीता खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

- **<u>प्रकल्पाची निवड व पुर्वतयारी :-</u>**

पीकाच्या क्षेत्रानुसार तसेच जेथे क्षेत्र वाढीस व उत्पादकता वाढीस वाव आहे याचा विचार करुन तालुकानिहाय/मंडळनिहाय राबवावयाचे प्रकल्पांची संख्या निश्चित करावी व संबंधित क्षेत्रिय अधिका-यांना तसे कळविण्यात यावे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयांतील ज्या तालुक्यांत पिकाचे क्षेत्र जास्त आहे परंतु उत्पादकता कमी आहे आणि क्षेत्र कमी परंतु उत्पादकता सरासरीपेक्षा जास्त आहे अशा तालुक्यांची प्राधान्याने प्रकल्पांतर्गत निवड करावी. अशा प्रकारे निवडलेल्या तालुक्यातील मंडळाची व गावांची निवड करुन प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. जिल्हयांतील सर्व तालुक्यामध्ये हा प्रकल्प राबविणे बंधनकारक नाही.

<u>मुलभूत सर्वेक्षण करणे.</u>

उत्पादन व उत्पादकता आधारीत प्रकल्पांची निवड व प्रकल्प अहवाल तयार करताना खालील बाबींचे मुलभुत सर्वेक्षण करण्यात यावे.

- निवडलेल्या क्षेत्रातील पीकनिहाय क्षेत्राचा तपशील प्रकल्पात दर्शविणे.
- पीकनिहाय व वाणनिहाय क्षेत्र व वाण निहाय उत्पादकता प्रकल्पात दर्शविणे.
- जमिन आरोग्य पत्रिका नुसार जमीनीचा सामु तसेच उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाष व सुक्ष्ममुलद्रव्ये यांचा तपशील प्रकल्पात दर्शविणे
- उपलब्ध सिंचन सुविधा त्यातील सिंचना खालील क्षेत्र .
- उपलब्ध ट्रॅक्टर/पॉवर टीलर/बैल जोडी संख्या तसेच औजारे निहाय प्रकल्पातील उपलब्धता
- पीकनिहाय निविष्ठा वापराचे प्रमाण व शिफारस प्रमाणे मात्रा व प्रत्यक्षात वापराचा तपशील
- उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळ सर्व्हिस प्रोव्हायडरची संख्या व सेवेचा तपशील
- निविष्ठा उपलब्धतेच्या सुविधा तसेच तयार झालेल्या कृषि मालाची पणन व्यवस्था
- शेतकरी समुह/गटाची निवड करणे व प्रकल्पात सहभागी होण्याकरीता त्यांची संमती घेणे.

- प्रकल्प आराखडा तयार करणे

सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या “संकरित” वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रकल्प स्वरुपात राबवावयाचा आहे. तुरपिका करीता प्रत्येकी १०० हेक्टर प्रमाणे ६० प्रकल्पाची निवड करुन कार्यक्रमाची अंमलबजावणी करावयाची आहे.

तुर पिकाचे १०० हेक्टर क्षेत्राचा लघुप्रकल्प आराखडा तयार करावा व क्षेत्र व उत्पादकता वाढीचे लक्षांक ठरविण्यात येऊन त्याचे नियोजन करण्यात यावे. लक्षांक ठरविताना सर्वात जास्त साध्य झालेली उत्पादकतेपेक्षा ***१५ टक्के*** जास्त प्रमाणात लक्ष निर्धारीत करण्यात यावे. या प्रकल्पाचे उद्दीष्ट व परीणाम काय अपेक्षित आहेत याची नीट मांडणी करुन प्रत्येकी १० हेक्टरचे १० लघुप्रकल्प आराखडे तयार करण्यात यावेत. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे ते नमुद करुन प्रगती अहवाल तयार करण्यात यावेत. तसेच त्याची विविध बाबींच्या छायाचित्रासहीत यशोगाथा तयार करण्यात यावी.

अ) सर्व प्रकल्प शेतक-यांचे गट करुन गटामार्फत कार्यक्रम राबविण्यास बंधनकारक करण्यात यावेत. आत्मा योजनेअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या गटांना प्राधान्य देण्यात यावे.

ब) तूर पिकांमध्ये सर्वसाधारणपणे १० हे. चे लघुगट तयार करुन प्रत्येक १० हे. मागे एक गटप्रमुख म्हणुन एका प्रगतिशील शेतक-याची निवड करण्यात यावी म्हणजेच एका प्रकल्पामध्ये सर्वसाधारण १० गट तयार करुन गटप्रमुखांची निवड करण्यात यावी.

क) गट प्रमुखांच्या सहाय्याने राबवावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे. तसेच त्याचे वेळापत्रकही तयार करण्यात यावे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ व महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ, यांचे क्षेत्रिय अधिका-यांशी संपर्क साधुन निविष्ठांचा पुरवठा कोणत्या ठिकाणी करावयाचा आहे याची माहीती दयावी व निविष्ठा पुरवठयाचे नियोजन करण्यात यावे.

ड) प्रती १०० हेक्टरच्या प्रकल्पामध्ये घ्यावयाचा कार्यक्रमाचे निविष्ठा पॅकेज व पिकनिहाय घ्यावयाची प्रात्यक्षिके संख्या **प्रपत्र (२)** मध्ये दर्शविण्यात आली आहे. प्रकल्प क्षेत्रात प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे

प्रकल्प घटक दिलेल्या प्रमाणात राबविले जातील याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. प्रकल्पाकातील निविष्ठा प्रकल्पाक्षेत्रात उपलब्ध करुन घ्यावी.

गट निर्मिती करताना सदरच्या गट संघटनासाठी आवश्यक रेकॉर्ड माहितीपुस्तिका देण्यात यावी. गटांच्या नावाचा संयुक्त स्वाक्षरीने बँकेत खाते उघडुन गटामार्फत वर्गणी जमा करुन बँक खात्यामध्ये जमा करावी जमा केलेल्या निधीतून गटासाठी प्रकल्पात न मिळणाऱ्या निविष्ठा खरेदी करुन गटामार्फत वाटप करावी. **सदरील गटाची नोंदणी आत्मा संस्थेकडे करण्यात यावी.**

इ) निविष्ठापुरवठा अहवाल खालील प्रपत्रात दर सप्ताहात सादर करण्यात यावा.

| अ.क्र | घटक | निश्चित केलल्या निविष्ठांचे नाव | लक्षांकानुसार मागणी | परिमाण | पुरवठा | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

- <u>योजनेतील बाबी</u>

१) <u>तुर पिक प्रात्याक्षिके</u>

संकरीत तुर पिकांचे प्रात्याक्षिकांचे आयोजन करावयाचे आहे. प्रत्याक्षिकांचे आयोजन करताना त्यामध्ये सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. <u>प्रात्यक्षिक अंतर्गत देय असलेल्या ( प्रति हेक्टर पिक प्रात्यक्षिकाचे निविष्ठा पॅकेज) बाबनिहाय आर्थिक मर्यादा प्रपत्र-१ मध्ये दर्शविलेली आहे.</u> प्रात्याक्षिक हेक्टर क्षेत्रावर आयेजित करावयाचे आहे. एक हेक्टर क्षेत्राच्या प्रात्याक्षिकारीता रक्कम रुपये १७२५/- या कमाल मर्यादेपर्यत अनुदान देय आहे. याव्यतीरीक्त येणारी अधिकची रक्कम ही लाभार्थी कडुन लोकवाटा म्हणुन घ्यावयाची आहे. <u>एक प्रकल्पासाठी समाविष्ठ असणाऱ्या बाबीचे प्रपत्र-२ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.</u>

<u>प्रात्याक्षिकांची आयोजन करताना खालील मार्गदर्शक सुचना अवलंब करण्यात यावा.</u>

१) प्रात्याक्षिक प्लॉट शेजारी पारंपारीक पध्दतीवर आधारीत तुलनात्मक प्लॉट घेण्यात यावा.

२) प्रात्याक्षिक पिकाचा उत्पादकता लक्षांक हा प्रात्याक्षिकासाठी निवड करण्यात आलेल्या वाणाच्या उत्पादन क्षमतेएवढा निश्चित करावा.

३)प्रात्याक्षिक प्लॉटला नियमीत भेटी देण्यात याव्यात. भेटीमध्ये केलेल्या मार्गदर्शनाची नोंद कृषि सहाय्यक यांनी क्षेत्रिय स्तरावरील नोंदबुकात करावी.

४)प्रात्याक्षिकासाठीच्या निविष्ठा वेळेपूर्वी लाभार्थीस उपलब्ध होणेसाठी आवश्यक ते नियोजन मंडळ कृषि अधिकारी यांनी करावे.

५) सदर प्रात्याक्षिके शक्यतो इतर शेतकऱ्यांना पाहाता येतील अशा ठिकाणी असावे.प्रात्याक्षिक प्लॉटला ठळकपणे दिसेल अशा प्रकारे फलक लावण्यात यावा. व आवश्यकतेनुसार त्यावर दिशा दर्शविणारा फलक स्वतंत्रपणे लावण्यात यावा. सदर प्रात्याक्षिकास परिसरातील शेतक-यांच्या भेटी घडवून आणाव्यात.

६) प्रात्याक्षिकांचे अंमलबजाणी कृषी सहाय्यक यांनी करावी व त्यांचे पर्यवेक्षण कृषि पर्यवेक्षक यांनी करावे.

७) प्रात्याक्षिकांचे मूल्यमापन उपविभागीय कृषि अधिकारी यांनी करावे.

८) लाभार्थ्यांची यादी ग्राम पंचायतीच्या नोटीसबोर्ड, कृषि विभागाच्या बेबसाईटवर जाहीर करावी. तसेच उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तालुकानिहाय पत्रकार परिषद घेऊन प्रसिध्दी दयावी.

९) प्रात्याक्षिक प्लॉटचे पिक कापणी प्रयोग घेऊन कंट्रोल प्लॉटसह तुलना करावी. व उत्पन्नाचा तुलनात्मक तक्ता कृषि आयुक्तालयास सादर करावा.

१०) प्रात्याक्षिक कार्यक्रम राबविताना प्रपत्र-१ मध्ये दर्शविल्यानुसार निविष्ठा पॅकेज देय आहे. बाबनिहाय दर्शविण्यात आलेल्या आर्थीक मर्यादेचे उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

- तूर पिकाकरीता निवड करण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये घ्यावयाच्या बाबींची माहिती प्रपत्र-२ मध्ये दर्शविलेली आहे.

२) सूक्ष्ममूलद्रव्यांचा वापर

राज्यामध्ये वेगवेगळया ठिकाणी निरनिराळया सूक्ष्ममुलद्रव्याचा अभाव आढळुन आलेला आहे. यासाठी सूक्ष्ममुलद्रव्याचा वापर ही बाब वेगवेगळया योजनामध्ये सन २००७-०८ पासुन समाविष्ट करण्यात आलेली आहे. यामध्ये सूक्ष्ममुलद्रव्याचा अभाव असलेल्या क्षेत्रामध्ये माती परीक्षणानुसार सूक्ष्ममुलद्रव्याच्या वापरासाठी किंमतीच्या रु. ५००/- प्रति हेक्टर या कमाल मर्यादेपर्यत अनुदान देय राहील. मृद चाचणी प्रयोगशाळेच्या अहवालानुसार ज्या सूक्ष्ममुलद्रव्याची कमतरता असेल त्यासाठी कार्यक्रम राबविण्यात यावा.

३) पिक संरक्षण औषधे

कडधान्य पीकांचे विविध कीड रोगांपासुन संरक्षण करणेसाठी लागणाऱ्या पीक संरक्षण औषधासाठी किंमतीच्या रु. ५०० प्रति हेक्टर या कमाल मर्यादेपर्यत अनुदान देय आहे. किड व रोगापासुन कडधान्य पिकाचे संरक्षण करण्यासाठी कृषि विद्यापिठाच्या शिफारशीनुसार पीक संरक्षण औषधांचा वापर करावयाचा आहे. तसेच किड व रोगाच्या प्रादुर्भावाबाबत किड व रोग सर्वेक्षणाच्या अहवाला नुसार वेळीच पीक संरक्षण औषधांची मागणी कृषि विभागाने मान्यता दिलेल्या संस्थांकडे नोंदवावी. कृषि आयुक्तालयाच्या गु.नि.५ कक्षामार्फत पुरवठयाचे दर हे सूचना निर्गमित केल्यानुसार अंतिम असतील. केंद्रिय किटकनाशक मंडळ व नोंदणी समितीने मान्य केलेल्या लेबल क्लेमनुसारच रासायनिक व जैविक किटकनाशकाचा पुरवठा करण्याची दक्षता घ्यावी.

४) जैविक खते

कडधान्य पिकांसाठी रायझोबीयम कल्चर २५० ग्रॅम व फॉस्फरस सोल्युबलाईझींग जिवाणुंचा (पीएसबी) २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे याप्रमाणे शिफारस आहे. त्यानुसार या बाबीचा पुरवठा होईल हे पहावे. बिजप्रक्रिया करताना बुरशी नाशकाची प्रक्रिया केल्यानंतरच जिवाणु संवर्धनाचा वापर करण्यात यावा. जिवाणु संवर्धनाची खरेदी गुण नियंत्रण विभागामार्फत निर्गमीत करण्यात आलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी. त्यानुसार कार्यक्रम राबवावा. जैविक खते किंमतीच्या प्रति हेक्टरी रु. १००/- अनुदान मंजुर आहे.

❖ प्रशिक्षण कार्यक्रम

या योजनेअंतर्गत संबधीत अधिकाऱ्याचे इक्रीसॅट हॅद्राबाद येथे प्रशिक्षण आयोजीत करण्यात येणार असुन याबाबत सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम आपणास अलहिदा कळविण्यात येईल.

प्रपत्र-३ मध्ये जिल्हानिहाय व बाबनिहाय आर्थिक व भौतिक कार्यकम दर्शविण्यात आला आहे.

## योजनेचे सनियंत्रण व मूल्यमापन

विविध स्तरावर खर्चाच्या तपासणीची टक्केवारी खालील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | स्तर | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सह संचालक | ०.५ % |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ % |
| ३ | उप विभागीय कृषि अधिकारी | ५ % |
| ४ | तालुका कृषि अधिकारी | १० % |
| ५ | मंडल कृषि अधिकारी | ५० % |

| | | |
|---|---|---|
| ६ | कृषि पर्यवेक्षक | १०० % |

## - अमंलबजावणी वेळापत्रक -

| अ.क्र. | बाब | खरीप अंतिम तारीख | रब्बी अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प निवड व प्रकल्प आराखडा तयार करणे | १० मे | १५ ऑगस्ट |
| २ | शेतक-यांच्या गटांची निवड | १५ मे | १५ ऑगस्ट |
| अ | गटांची सभा | १६ ते २० मे | १६ ते २०ऑगस्ट |
| ब | गटासाठी निविष्ठा मागणी | १६ ते २० मे | १६ ते २०ऑगस्ट |
| ३ | संकलित निविष्ठांची मागणी | २० मे | १५ ऑगस्ट |
| ४ | विस्तार अधिकारी प्रशिक्षण | २५ मे | १५ ऑगस्ट |
| ५ | बियाणे पुरवठा | २५ मे | १५ सप्टेंबर |
| ६ | खत पुरवठा व जिवाणु खते पुरवठा | २५ मे | १५ सप्टेंबर |
| ७ | यशोगाथा सादर करणे | डिसेंबर | एप्रिल |

## लाभार्थिची ऑनलाईन माहिती भरणे

राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या "संकरित" वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोस्ताहन देणेबाबत आयोजीत केले आहे. कार्यक्रमामध्ये लाभार्थ्यांना निरनिराळ्या बाबीचा लाभ देण्यात येतो. याविषयाची तालुकानिहाय माहिती ऑनलाईनवर भरण्याविषयी केंद्र शासनाने सूचीत केलेले आहे. या करीता केंद्र शासनाचे वेबसाईटवर माहिती भरण्याची व्यवस्था केलेली आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या "संकरित" वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोस्ताहन देणेबाबत. कार्यक्रमामध्ये समाविष्ठ असलेल्या जिल्ह्यामधील सर्व तालुका कृषि अधिकारी यांनी निरनिराळ्या घटकांअंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहिती ऑनलाईन भरावयाची आहे. यासाठी उप विभागीय कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चीत करण्यात आली असल्याने त्यांनी सतत पाठपुरावा करुन वेळीच माहिती भरली जाईल हे पहावे.

संकेतस्थळावरती माहिती भरणे अनिवार्य असल्यामुळे अपूर्ण माहिती असल्यास पुढील निधीची तरतुद केली जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी. राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या "संकरित" वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोस्ताहन देणेबाबत. गावनिहाय वाटप केलेल्या निविष्ठा, प्रात्यक्षिके व इतर दिलेले लाभ या बाबतची लाभार्थिची यादी ग्राम पंचायत कडे पाठवुन सदरील माहिती ग्रामसभेत सादर करावी.

## विशेष सूचना

योजनेतील मंजूर लक्षांकास अनुसरून आयुक्तालय स्तरावरून बाबनिहाय दिलेल्या लक्षांकानुसार दिलेल्या योजनेची अंमलबजावणी करणेची आहे. आयुक्तालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही परिस्थितीत क्षेत्रिय स्तरावरून बाबबदल करणेत येऊ नये.

विविध योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शेतकरी वाटा/हिस्सा याचा समावेश असून सदर हिस्सा क्षेत्रिय स्तरावर क्षेत्रिय कर्मचा-यामार्फत शेतक-यांकडून गोळा केला जातो. हा हिस्सा प्राप्त होताच सत्वर संबधीत पुरवठादार संस्थेकडे भरणा करणेसाठी कार्यालयात जमा करावा. याबाबत मा. आयुक्त यांचे कक्षामधून लेखा विषयक कार्यपध्दतीबाबत सविस्तर परिपत्रक निर्गमीत केले आहे. शेतकरी वाटा कार्यालयात जमा करण्यास दिरंगाई केल्यास हा अपहार समजून या बाबत विलंब आढळल्यास कार्यालय प्रमुखाने संबधीतांवर प्रशासकीय कार्यवाही करावी. अन्यथा कार्यालय प्रमुखास जबाबदार धरणेत येऊन या बाबत त्यांचे विरूध्द आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रत्येक जिल्हयाने व विभागाने दरमहा ५ तारखेपर्यत बाबनिहाय मासिक प्रगती अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

प्रपत्र -१

सन २०१४-२०१५ राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या “संकरीत” वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोत्साहन देणे बाबतचा प्रात्याक्षिके पॅकेज. (प्रति हेक्टर) (रु.हजारात)

| **अ.क्र.** | **घटक** | **निविष्ठा** | **महत्तम अनुदान मयार्दा (रु)** | **मात्रा/परिमाण** | **लोकवाटा** |
|---|---|---|---|---|---|
| १ | बियाणे | बियाणे (सत्यप्रत) | ६२५ | महाबीजचे दरानुसार | |
| | | झिंक सल्फेट | | | |
| २ | एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन | फेरस सल्फेट | ५०० | विद्यापीठाचे शिफारशीनुसार | |
| | | बोरॉन | | | |
| | | Azardiactin 1500ppm | | | |
| | | HaNPV | | | |
| | | BT | | विद्यापीठाचे शिफारशीनुसार | |
| ३ | एकात्मिक किड व्यवस्थापन | Quinolphos 25 EC | ५०० | | |
| | | Dimethoate 30 EC | | | |
| | | Emamectin benzoate | | | |
| ४ | जैविक खते | रायझोबीयम, पीएसबी, ट्रायकोडरमा | १०० | विद्यापीठाचे शिफारशीनुसार | |
| **एकुण** | | | **१७२५** | | |

प्रपत्र -२

| सन २०१४-२०१५ राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूरपिकाच्या "संकरित" वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोस्ताहन देणे बाबत. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **घटक** | **निविष्ठा** | **परिमाण** | **लक्ष** | |
| | | | | **भौतिक** | **आर्थिक** |
| १ | बियाणे | बियाणे (सत्यप्रत) | हेक्टर | **६०००** | **३७.५०** |
| २ | एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन | झिंक सल्फेट<br>फेरस सल्फेट<br>बोरॉन | हेक्टर | ६००० | ३०.०० |
| ३ | एकात्मिक किड व्यवस्थापन | Azardiactin 1500ppm<br>HaNPV<br>BT<br>Quinolphos 25 EC<br>Dimethoate 30 EC<br>Emamectin benzoate | हेक्टर | ६००० | ३०.०० |
| ४ | जैविक खते | रायझोबीयम, पीएसबी, ट्रायकोडरमा | हेक्टर | ६००० | ६.०० |
| ५ | मनुष्यबळ विकास | प्रशिक्षण | संख्या | २ | २.५० |
| | एकुण | | | | १०६.०० |

प्रपत्र-३

**सन २०१४-२०१५ राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत – तूर पिकाच्या “संकरीत” वाणाच्या उत्पादन कार्यक्रमास प्रोस्ताहन देणे बाबतचा कार्यक्रम.**
**(रु. लाखात)**

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **घटक** | | | | | | | | | | **एकूण प्रत्याक्षिके क्षेत्र(हे.)** | **तरतुद (रु.लाखात)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्रत्याक्षिक** | | **एकात्मिक किड** | | **पिक सौरक्षण औषध** | | **जौविक खते** | | **प्रशिक्षण** | | | |
| | | **भौतिक (हे.)** | **आर्थीक** | **भौतिक (हे.)** | **आर्थीक** | **भौतिक (हे.)** | **आर्थीक** | **भौतिक (हे.)** | **आर्थीक** | **भौतिक (हे.)** | **आर्थीक** | | |
| १ | नंदुरबार | १०० | ०.६२५ | १०० | ०.५०० | १०० | ०.५०० | १०० | ०.१०० | २ | ०.०४२ | १०० | १.७६७ |
| २ | जळगाव | १०० | ०.६२५ | १०० | ०.५०० | १०० | ०.५०० | १०० | ०.१०० | २ | ०.०४२ | १०० | १.७६७ |
| ३ | अहमदनगर | १०० | ०.६२५ | १०० | ०.५०० | १०० | ०.५०० | १०० | ०.१०० | २ | ०.०४२ | १०० | १.७६७ |
| ४ | सोलापूर | १०० | ०.६२५ | १०० | ०.५०० | १०० | ०.५०० | १०० | ०.१०० | २ | ०.०४२ | १०० | १.७६७ |
| ५ | औरगाबाद | २०० | १.२५० | २०० | १.००० | २०० | १.००० | २०० | ०.२०० | २ | ०.०८३ | २०० | ३.५३३ |
| ६ | जालना | ३०० | १.८७५ | ३०० | १.५०० | ३०० | १.५०० | ३०० | ०.३०० | २ | ०.१२५ | ३०० | ५.३०० |
| ७ | बीड | ३०० | १.८७५ | ३०० | १.५०० | ३०० | १.५०० | ३०० | ०.३०० | २ | ०.१२५ | ३०० | ५.३०० |
| ८ | लातूर | ५०० | ३.१२५ | ५०० | २.५०० | ५०० | २.५०० | ५०० | ०.५०० | ४ | ०.२०८ | ५०० | ८.८३३ |
| ९ | उस्मनाबाद | ५०० | ३.१२५ | ५०० | २.५०० | ५०० | २.५०० | ५०० | ०.५०० | ४ | ०.२०८ | ५०० | ८.८३३ |
| १० | नादेंड | ३०० | १.८७५ | ३०० | १.५०० | ३०० | १.५०० | ३०० | ०.३०० | २ | ०.१२५ | ३०० | ५.३०० |
| ११ | परभणी | ३०० | १.८७५ | ३०० | १.५०० | ३०० | १.५०० | ३०० | ०.३०० | २ | ०.१२५ | ३०० | ५.३०० |
| १२ | हिगोली | २०० | १.२५० | २०० | १.००० | २०० | १.००० | २०० | ०.२०० | २ | ०.०८३ | २०० | ३.५३३ |
| १३ | बुलढाणा | ४०० | २.५०० | ४०० | २.००० | ४०० | २.००० | ४०० | ०.४०० | २ | ०.१६७ | ४०० | ७.०६७ |
| १४ | अकोला | ३०० | १.८७५ | ३०० | १.५०० | ३०० | १.५०० | ३०० | ०.३०० | २ | ०.१२५ | ३०० | ५.३०० |
| १५ | वाशिम | ३०० | १.८७५ | ३०० | १.५०० | ३०० | १.५०० | ३०० | ०.३०० | २ | ०.१२५ | ३०० | ५.३०० |
| १६ | अमरावती | ६०० | ३.७५० | ६०० | ३.००० | ६०० | ३.००० | ६०० | ०.६०० | ४ | ०.२५० | ६०० | १०.६०० |
| १७ | यवतमाळ | ६०० | ३.७५० | ६०० | ३.००० | ६०० | ३.००० | ६०० | ०.६०० | ४ | ०.२५० | ६०० | १०.६०० |
| १८ | वर्धा | ४०० | २.५०० | ४०० | २.००० | ४०० | २.००० | ४०० | ०.४०० | ३ | ०.१६७ | ४०० | ७.०६७ |
| १९ | नागपूर | ३०० | १.८७५ | ३०० | १.५०० | ३०० | १.५०० | ३०० | ०.३०० | ३ | ०.१२५ | ३०० | ५.३०० |
| २० | चंद्रपूर | १०० | ०.६२५ | १०० | ०.५०० | १०० | ०.५०० | १०० | ०.१०० | २ | ०.०४२ | १०० | १.७६७ |
| **एकूण** | | **६०००** | ३७.५०० | ६००० | ३०.००० | ६००० | ३०.००० | ६००० | ६.००० | **५०** | २.५०० | **६०००** | १०६.००० |